# जालना जिल्ह्यातील लोकसंख्या घनतेचा भौगोलीक अभ्यास

**प्रा.डॉ.सोमीनाथ सारंगधर खाडे**
भूगोल विभाग,
राष्ट्रमाता इंदीरा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
जालना

**श्री मनोज मधुराज डोईफोडे**
संशोधक विद्यार्थी (भूगोल)

**प्रस्तावना:**

लोकसंख्या घनतेचा भौगोलीक अभ्यास म्हणजे काय? क्षेत्रफळाच्या प्रमाणात लोकसंख्येची विभागणी म्हणजे त्याची घनता होय.लोकसंख्या मोजण्याला जनगणना किंवा प्राचिन भाषेत खानेसुरी असेही म्हणतात. प्रत्येक देश आपल्या लोकसंख्येची ठरावीक काळा नंतर जनगणना करत असतो. हा कालावधी साधारणत: १० वर्षे इतका असतो. त्यानुसार त्याची आकडेवारी प्रकाशीत केली जाते.जागतीक लोकसंख्येत होत असणारी वाढ व त्याचा परिणाम आज जगामधे दिसत आहे.

आज सर्व समस्येचे उत्तर लोकसंख्या नियंत्रण व त्यांचे नियोजन झाले पाहिजे त्यामुळे मी अभ्यासासाठी महाराष्ट्नतील मराठवाड्यातील जालना जिल्ह्याची निवड केली असून जालना जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास करण्याचे निश्चीत केले आहे. लोकसंख्या भुगोल ही मानवी भुगोलाचीच नव्याने उदयास आलेली एक उपशाखा आहे. लोकसंख्या किंवा मानवी समुह हा पृथ्वीचा पृष्ठभागावरील सर्वात घटक आहे.

मानवाकडे असलेली बौध्दिक क्षमता,कल्पना दुरदृष्टी श्रम करण्याची प्रवृत्ती शास्त्रीय तांत्रिक ज्ञान इ.गुणांुळे तो विविध सांधनाची निर्मीती करतो अभिकर्ता म्हणून संबोधले जाते. मानवी लोकसंख्या ही जन्म,मृत्यु,विवाह,स्थलांतर यांच्या प्रमाणावरुन ठरते ज्या भागात जन्माचे म्हणजेच जननाचे प्रमान जास्त असते व मृत्युचे म्हणजे मृर्त्यतेचे प्रमाण कमी असते. तेथे विवाहाचे प्रमाण जास्त आहे. व ज्या भागात चरितार्थासाठी विकासासाठी लोकार्षित होतात तेथे लोकसंख्येचे दाटी झालेली असते.वाढणारी लोकसंख्या ही अधिक कुशल तंत्रज्ञानी व विज्ञान समृध्द असेल तर उच्च प्रतीचा सास्कृतीक विकास होत असतो दुसऱ्या महायुध्दीत उदवस्त झालेले जपान हे देश तेथील लोकांच्या कर्तृत्वामुळेच उद्योगप्रधान संपन्न बनलेले आहेत.लोकसंख्योशिवाय राष्ट्नला किंवा पुर्णता येत नाही.

**जालना जिल्ह्यातील लोकसंख्या घनता:**

जालना हे जिल्ह्याचा मुख्यालयाचे ठिकाण आहे. औरंगाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन १ मे १९८१ रोजी स्वतंत्र जालना जिल्हा अस्तित्वात आला महाराष्ट्नच्या मराठवाडा विभागातील जिल्ह्यांपैकी जालना हा एक जिल्हा आहे. त्याप्रमाणे जालना जिल्ह्याची लोकसंख्या १९८१ वर्षी १०,२६,२५२ इतकी होती व अंदाजे १९,००,६२ सन २०११ नुसार इतकी आहे.

तक्ता क्र. १ - जालना जिल्ह्यातील लोकसंख्या घनता (वर्षे १९८१ ते २०११)

| वर्षे | लोकसंख्या | दशवार्षिक वाढ (%) |
|---|---|---|
| १९८१ | १०२६२५२ | +१.३९ |
| १९९१ | १३५९५८९ | +२.८५ |
| २००१ | १६०७३९१ | +१.६९ |
| २०११ | १९५९०४६ | +२.०० |

स्त्रोत: जनगणना अहवाल सन १९८१ ते २०११

जालना जिल्ह्यातील सन १९८१ ते २०२१ मधील लोकसंख्येची घनता ही विविध संशोधन अभ्यास पध्दती व्दारे प्रस्तुत शोधनिबंधात दाखविली आहे. सन १९९१ मध्ये जिल्ह्यात १७७ प्रति चौ. कि.मी. लोकसंख्येची घनता आढळते. तर सन २००१ मध्ये २०९ प्रती. चौ. कि.मी आढळते व सन २०११ मध्ये लोकसंख्येची घनता २५४ प्रती. चौ. कि. मी इतकी आढळते. जालना जिल्ह्याच्या लोकसंख्येचा विचार करता १९८१ ते १९९१ या दहा वर्षात जालना जिल्ह्याची लोकसंख्येची वाढ ही २.८५ % एवढी आहे व १९९१ ते २००१ या दहा वर्षात लोकसंख्येची वाढ ही थोडी कमी आढळून येते. १९९१ ते २००१ या दहा वर्षात लोकसंख्येची वाढ ही १.६९ % एवढी आहे.सन २००१ ते २०११ या दहा वर्षात लोकसंख्येची वाढ ही २.००% एवढी झाली आहे. जालना जिल्ह्याच्या लोकसंख्येचा विचार करता १९८१ ते १९९१ या दहा वर्षात जालना जिल्ह्याची लोकसंख्या ही १३ लक्ष ५९ हजार ५८९ एवढी आहे व १९९१ ते २००१ या दहा वर्षात लोकसंख्या १६ लक्ष ७ हजार ३९१ आढळून येते. सन २००१ ते २०११ या दहा वर्षात लोकसंख्या ही १९ लक्ष ५९ हजार ४६ एवढी झाली आहे.

**जालना जिल्ह्यातील तालूका निहाय लोकसंख्या घनता (सन १९९१ ते २००१ व २००१ ते २०११):**

जालना जिल्ह्यातील तालूका निहाय लोकसंख्या घनता (सन १९९१ ते २००१ व २००१ ते २०११) तक्ता क्र. २ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. २ जालना जिल्ह्यातील तालूका निहाय लोकसंख्या घनता (सन १९९१ ते २००१ व २००१ ते २०११):**

| तालुका | १९९१ ते २००१ | | | २००१ ते २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकुण | ग्रामीण | नागरी | एकुण | ग्रामीण | नागरी |
| भोकरदन | २१८ | २०४ | १५ | २६४ | २४३ | २४ |
| जाफ्राबाद | १९० | १९० | -- | २२५ | २२५ | -- |
| ज़ालना | ३७० | १६८ | २०२ | ४५५ | २०० | २४५ |
| बदनापुर | १६९ | १६९ | -- | १९८ | १९८ | |
| अंबड | १७९ | १५६ | २३ | २२१ | १९४ | २८ |
| घनसावंगी | १५५ | १५५ | -- | १८९ | १८९ | -- |
| परतुर | १९८ | १५८ | ४० | २४१ | १९३ | ४९ |
| मंठा | १५९ | १५९ | -- | २०३ | २०३ | -- |

स्त्रोत: जनगणना अहवाल, १९९१, २००१, २०११

सन १९९१ ते २००१ च्या जनगणनेप्रमाणे जालना जिल्ह्याची घनता १६३८ इतकी तर ग्रामिण भागातील १३५९ व नागरी भागातील २८० इतकी घनता आढळून आलेली आहे. सन २००१ ते २०११ या दहा वर्षाच्या कालवधीत जिल्ह्यातील घनतेचा विचार करता घनतेत १९९६ झाली तर ग्रामिण भागात १६४५ झालेली आहे. तर नागरी भागातील ३४६ इतकी झालेली आढळून येते. सन २००१ ते २०११ या दहा वर्षात जालना तालूक्यात एकुण घनता १९९६ आहे. जालना तालुक्यातील ही वाढ जालना शहरामुळे नोंदविल्या गेली आहे. ग्रामिण भागातील घनतेत मात्र वाढ झालेली आढळून येते. भोकरदन तालुक्यातील लोकसंख्येची घनता सन २००१ मध्ये २१८ तर सन २०११ मध्ये २६४ व्यक्ती प्रती चौ. कि.मी. इतकी होती. या दहा वर्षात त्यात ४६ ने वाढ झोलेली आढळून येते. भोकरदन तालुक्यातील ग्रामिण भागात सन २००१ ते २०११ या कालवधीत ३९ ने वाढ झाली.

घनसावंगी तालुक्यामध्ये कुठलेही मोठे शहर नसल्यामुळे नागरी लोकसंख्येची नोंद नाही. संपुर्ण तालुका ग्रामिण भागात मोडतो. या ग्रामिण भागातील लोकसंख्येच्या घनतेध्ये ही दखल घेण्याएवढा बदल झालेला नाही. भोकरदन तालुक्याची सन १९९१ ते २००१ मध्ये असणारी एकूण घनता २१८ आहे. ही सन २००१ ते २०११ मध्ये २६४ पर्यंत वाढलेली आहे ही वाढ ४६ एवढी आहे तर नागरी भागातील वाढ ही सन १९९१ ते २००१ मध्ये१५ ईतकी नोंदवल्या गेली आहे. जालना तालुका वगळता ही वाढ सर्वात जास्त आहे. जालना तालुक्याची लोकसंख्या घनता १९९१ ते २००१ यामध्ये ३७० एवढी होती ती २००१ ते २०११ मध्ये ४४५ एवढी झाली आहे. यातील नागरी वाढ ही ४३ एवढी आहे.

**संदर्भ :**

1. Census of India Maharashtra (1991) Jalna District Hand Book.
2. Cesus Of India (2001) Maharashtra 2011
3. Census Of Handbook of Jalna District 2001
४. जिल्हा सामाजिक अर्थिक समोलोचन ,जालना (१९९१-२००१)
५. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, जालना (२००१ - २०११)
६. महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००१